Corporation
Old S.T. Stand, Kapali
Bhiwandi (Dist – Thane)
Maharashtra
Pin code 421302

भिवंडी नि.शहर महानगरपालिका
[illegible], कप्तळी,
भिवंडी ४२१ ३०२, जि.ठाणे

Phones: 02522 – 255314/255315, Fax. 02522 – 252074, Gmail - [illegible]@gmail.com

जा.क्र./भिनिशमनपा/उद्यान/[illegible]/२०१९
दि. ०६/१२/२०१९

## बांधकामपूर्व वृक्षप्राधिकरणाचा नाहरकत दाखला

प्रति,
मा. सहाय्यक संचालक सो.
नगररचना विभाग
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

विषय :- बांधकाम परवानगी अंतर्गत वृक्षप्राधिकरणाचा नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ :- जा.क्र./भिनिशमनपा/न.र.वि./३२१८ दि. २९/११/२०१९ चे उद्यान आ.क्र.१३६८, दि.०३/१२/२०१९ रोजीचे प्राप्त पत्र

उपरोक्त विषयांकीत संदर्भित पत्रान्वये उद्यान विभाग वृक्षप्राधिकरणाचा बांधकाम परवानगी प्राप्त करणे करीता नाहरकत दाखला अपेक्षीला आहे. तदअनुषंगाने अर्जासोबत जोडलेले कागदपत्रे पहाता मौजे – निजामपूर सि.स.नं. ५९५,५९६ येथील क्षेत्र -६९२.३० चौ.मी. जागेची प्रत्यक्ष स्थळ पहाणी दि. ०४/१२/२०१९ रोजी केली असता, सदर भुखंडावर शेवगा-३, भेंड-१ जातीची एकुण - ४ मोठी झाडे आढळून आलेली आहेत.

तरी अर्जदार यांसी खालील अटी शर्तीस बंधनकारक ठेवून उपरोक्त क्षेत्रामध्ये बांधकाम पुर्व विकास कामास वृक्षप्राधिकरणाचा नाहरकत दाखला देण्यात येत आहे.

### अटी-शर्ती

१. अस्तित्वात असलेल्या झाडांचे जतन व संवर्धन करणे अर्जदारास बंधनकारक आहे. तसेच अस्तित्वात असलेली झाडे विकास कामास बाधीत होत असल्यास सदर झाडे काढणेबाबत वृक्षप्राधिकरणांची स्वतंत्र परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.
२. विकासक यांनी अस्तित्वात असलेल्या झाडांचे संवर्धन करुन विकासीत करीत असलेल्या मोकळया जागेत वापर परवाना मिळण्यापुर्वी बकुळ, निम, कदंब, सात्वीन, टॅबक्युआ, फॉक्सटेल पाम, बॉटल ब्रश, बहावा, स्पॅथोडीया, अशोक, बदाम, सिल्वर ओक, गुलमोहर, सोनमोहर, इ. जातीची किमान ४ फुट पेक्षा जास्त उंची असलेल्या वृक्षप्रजातींची अतिरीक्त नवीन ८ झाडे लागवड करुन त्यांचे जतन व संवर्धन करणे विकासकास बंधनकारक आहे.
३. बांधकाम करण्यांत येणाऱ्या इमारत परिसरात पर्यावरणाचा समतोल राखला जाईल यासाठी पक्षांकरीता कृत्रीम घरटे किंवा तत्सम व्यवस्था करण्यांत यावी.
४. सदर भुखंडाबाबत काही चुकीची माहिती दिली आहे असे निदर्शनास आल्यास महानगरपालिकेची दिशाभूल केल्याचे समजण्यांत येईल व सदर दाखला आपोआप रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.
५. अट क्र. २ चे अनुपालन केलेचे दिसून न आल्यास सदर विकासकारास बांधकाम वापर दाखला करीता वृक्षप्राधिकरणाचा नाहरकत दाखला देण्यांत येणार नाही याची विकासकाराने नोंद घ्यावी.

(नितीश सा. संखे)
उद्यान अधिक्षक तथा
वृक्षअधिकारी
उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

प्रत :- अर्जदार - अताउर्रहेमान मोह. हाशिम अन्सारी व ईतर
द्वारा, मे.एस.एस. असो, भिवंडी जि.ठाणे

Scanned with CamScanner

BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNICIPAL
CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T.STAND, KAPALI,
BHIWANDI - 421 302, DIST.THANE.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी, जि.ठाणे
महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड,कासारआळी,
भिवंडी - ४२१ ३०२, जि.ठाणे.

TEL : 02522-55314/55315, FAX : 02522-52074

जा.क्र./भिनिशमनपा/नगररचना/बा.प्र.क्र.६७/२०१९-२०२० / 95 दि. 2-19 /2020

**प्रारंभ प्रमाणपत्र**

प्रति,
श्री. जुबेर अहमद हाजी इसहाक मोमीन व इतर-५ तर्फे मुखत्यारपत्रधारक
श्री. अताऊर रहेमान मोहम्मद हाशीम अन्सारी व इतर-३
द्वारा :- श्री. साजीद मोह. अय्युब मोमीन,इंजिनिअर,मे. एस.एस.असोसिएट्स
६४,मालानी बिल्डींग,पार नाका,भिवंडी

**विषय :- बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**मौजे-निजामपूर येथील सि.स.नं. ५९५ व ५९६**

**संदर्भ :- १) या कार्यालयाकडील बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./३६१८**
**दि.२४/१२/२०१९**
**२) आपला दि.०२/०१/२०२० रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत जागेमध्ये आपणांस बांधकाम परवानगी संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर करणेत आली आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ मधील अर्जान्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र अपेक्षिलेले आहे. सबब आपणांस कळविण्यांत येते की, **मंजुर बांधकाम परवानगीतील अटी/ शर्तीच्या व खालील अटी / शर्तीच्या अधिन राहून इमारतीचे बांधकाम प्रारंभ करण्यास अनुमती देण्यात येत असून त्यानुसार जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण करावे** व त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र मिळणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीतील अपेंडीक्स "XII" नुसार अर्ज करावा व अपेंडीक्स "XIII" नुसार जोता तपासणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच जोत्यावरील पुढील बांधकामास सुरुवात करावी.

१. भुखंडाच्या महसुली हद्दीनुसार तसेच विकास योजना रस्त्याच्या रुपरेषे (Alignment) नुसार कुंपणांचे बांधकाम करणे अर्जदारावर बंधनकारक राहील अशा मंजूर नकाशाच्या हद्दीप्रमाणे सामासिक अंतरे जोता तपासणी वेळी उपलब्ध होतील याची सर्वस्वी जबाबदारी ही अर्जदाराची राहील.
२. प्रस्तावित बांधकामास जोता तपासणी प्रमाणपत्र व वापर दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये अन्यथा तो अनधिकृत समजून कार्यवाही करणेत येईल.
३. तसेच संदर्भ क्र. १ अन्वये मंजुर बांधकाम परवानगीतील इतर अटी/शर्तीचे देखील पालन करणे आपणांवर बंधनकारक आहे.

आपला,

**(प्रल्हाद होगेपाटील)**
**सहाय्यक संचालक,नगररचना**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**
**भिवंडी.**

प्रत :- प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ५ यांना माहितीसाठी रवाना.

N-6 २५७

Scanned with CamScanner

Mah Permission 20

वाचले-

१. मे. एम एम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स चे भागीदार श्री. आताहुन रहमान अन्सारी व इतर, रा. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र यांचा दि. ११/१२/२०१९ रोजीचा अर्ज.
२. मंडळ अधिकारी भिवंडी यांचा दिनांक ११/१२/२०१९ रोजीचा अहवाल.
३. महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३.
४. मंजुर टिपणी दिनांक11/१२/२०१९

---

क्रमांक मशा/क-१/टे-२/वसूली/एसआर 27 २०१९-२०
दिनांक-11 / १२/२०१९

आदेश :-

ज्याअर्थी मे. एम एम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स चे भागीदार श्री. आताहुन रहमान अन्सारी व इतर, रा. भिवंडी, जि. ठाणे यांनी मौजे भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र येथील स.नं. ५९५ व ५९६ मधील क्षेत्र ५२.७ चौ मी. या जमिनीतुन १०० ब्रास माती या गौणखनिजाचे उत्खनन करणेकामी या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

जमिनीचा प्रकार

| अ.क्र. | जमिनीचे वर्णन | क्षेत्र | | आकार | भोगवटदाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | हे.आर. | पो.ख. | | |
| १ | स.नं. ५९५ व ५९६ | ५२.७ चौमी | - | - | रहीमा हाजी मो. इस्हाक मोमिन व इतर |

ज्या अर्थी सदर जागेत १० ब्रास दगड/माती या गौणखनिजाचे उत्खनन करणेकामी मंडळ अधिकारी भिवंडी यांनी चौकशी करुन जबाब- पंचनाम्यासह अहवाल सादर केलेला आहे. तसेच अर्जदार यांनी गौणखनिज परवाना अर्ज फी व भुपृष्ठ भाडे याप्रमाणे रक्कम खालीलप्रमाणे सरकारी खजिन्यात भरणा केलेली आहे.

| अ.क्र. | ब्रास | परवाना फी | भुपृष्ठ भाडे | स्वामित्वधन | एकुण रक्कम | चलन क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०० | ५००/- | २११०/- | ४०,०००/- | ४२,६१०/- | च.क्र. /२०१९-२० जिआरएन- दि. /१२/२०१९ |

त्याअर्थी वरील वस्तुस्थितीनुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मौजे भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील वरील नमुद जमिनीत १०० ब्रास माती या गौणखनिजाचे उत्खनन करणेकामी परवानगी देण्यात येत आहे.

१) परवानाधारक यांनी मौजे भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील वरील नमुद जमिनीत १०० ब्रास माती या गौणखनिजाचे उत्खनन हे अर्जदार यांचे मालकीच्या जमिनीत करणार असल्याने सदर जागेव्यतिरिक्त अन्य जागेत उत्खनन करु नये.
२) नदीच्या/खाडीच्या पुलापासुन २००० फुटाचे (५०० मिटर्स) आत दगड/मातीचे उत्खनन करु नये.
३) परवानाधारकाने वेळोवेळी प्रपत्रात गौणखनिज उत्खननाबाबतचे हिशोब नोंदवुन संबंधित कार्यालयास सादर करावा.
४) एकादया त्रि-हाईत पक्षकाराचा हक्क निर्माण झाल्यास त्याची माहिती परवानाधारकाने शासनास दयावी व तसेच निर्माण झालेले वाद/हक्क स्वखर्चाने सोडवावेत.
५) परवानाधारकाने आदेशातील अटींचे पालन करणेस कसुर केल्यास परवाना रद्द करण्यांत येईल, परवाना रद्द केल्यावर परवान्याप्रमाणे संबंधित भुखंडावर पडुन राहिलेले उत्खननाचे साहित्य हे शासनाची पुर्ण निरपवाद मालमत्ता ठरेल.
६) शासनाने वेळोवेळी स्वामित्वधनाचे दरात वाढ केल्यास होणारी फरकाची रक्कम सरकार जमा करणे हे परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहिल.
७) माती/दगडाचे उत्खनन अशा रितीने करावे की, जेणेकरुन खाजगी तथा सार्वजनिक मालमत्तेस धोका/

Scanned with CamScanner

हानी करणार नाही, असे नुकसान निदर्शनास आल्यास परवानाधारकास जबाबदार धरण्यात येईल व त्या नुकसानीची भरपाई परवानाधारक यांचेकडून वसूल करण्यात येईल.

८) परवानाधारकास दिलेल्या परवान्यातील मुदतीतच व परवान्यात नमूद केलेल्या ब्रासएवढ्या मातीचा साठा करावा व नमूद केलेला साठा संपूर्णतः उचलला गेला नाही तर परवान्यातील अटी तत्वतः लागू राहतील.

९) निर्गत परवान्यावर तारीख व वेळ नमूद केली नाही तर वाहतूक अनधिकृत समजण्यात येईल. ज्या ठिकाणाहून गौणखनिज उत्खननाचा परवाना दिला आहे त्या ठिकाणी जमिनीच्या पृष्ठभागावर ३० फुटाहून अधिक खड्डा करता येणार नाही.

१०) सदर उत्खननाची वाहतूक सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेतच करावी व वेळ व्यतिरिक्त गौण खनिज वाहतूक करताना परवानगीची प्रत सोबत ठेवणे आवश्यक आहे. तसेच गौणखनिजाचे वाहतूक करणारे प्रत्येक वाहन ताडपत्रीने पूर्णपणे झाकून घ्यावे व वाहनातून कोणत्याही प्रकारे गौणखनिज रस्त्यावर पडणार नाही, याची दक्षता घ्यावी.

११) पूल, तलाव, रस्त्याच्या ५०० फुटाचे आत गौण खनिज काढू नये.

१२) खाजगी मालकीच्या जमिनीतून माती अगर गौणखनिज काढू नये.

१३) परवानाधारक यांनी नियोजित जागेपासून ५०० मिटरच्या परिसरात लोकवस्ती, रस्ते, कालवे, पाईपलाईन, नदया, असता कामा नयेत, असे आढळून आल्यास दिलेला परवाना रद्दबातल समजण्यात येईल.

१४) शासनाकडील सी. आर. झेड. अधिसूचनेमधील अटी/ शर्तीचा भंग झाल्यास दिलेला परवाना रद्द करता येईल.

१५) परवानाधारक यांनी उत्खनन केलेली माती कांदळवनापासून ५० मिटर परिसरात भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास केल्यास किंवा गौण खनिज उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास ते दंडनिय कार्यवाहीस व शिक्षेस पात्र ठरतील तसेच दिलेला परवाना आपोआप रद्दबातल ठरला जाईल.

१६) दगड उत्खननाकरीता ब्लास्टिंग करावयाचे असल्यास सक्षम अधिकाऱ्याकडून प्रथम परवाना घ्यावा.तसेच दगडाचे उत्खनन करताना आजुबाजूच्या वस्तीस धोका अगर त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. ब्लास्टींग करताना आजुबाजूच्या वस्तीस धोका पोहचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित परवानाधारक यांची राहील.

१७) सदरची जमीन वन क्षेत्रालगत असल्यास अर्जदार यांनी वनक्षेत्र हद्दीपासून ५ मिटर अंतर सोडून खोदकाम करावे. कोणत्याही परिस्थितीत वन जमिनीत जाऊन उत्खनन होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१८) परवान्यात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक/कब्जेदार/विकासक यांच्या वतीने जो अर्जदार गौणखनिज उत्खननाबाबत परवानगी घेऊन गौणखनिजाचे उत्खनन करील त्यावेळी कोणत्याही प्रकारची जिवीतहानी/प्राणहानी/वित्तहानी झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मालक म्हणून परवानाधारक यांची राहील.

१९) परवान्याची मुदत दिनांक 03/03/२०20 ते दिनांक 25/०३/२०२० पर्यंत वैध राहील.

तहसिलदार भिवंडी

प्रत-

१) मे. एम एम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स चे भागीदार श्री. आताहुन रहमान अन्सारी व इतर, रा. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र यांना माहितीसाठी.

२) मंडळ अधिकारी भिवंडी यांचेकडे

२/- परवान्याची मुदत संपताच व परवान्यात नमूद केलेप्रमाणे तेवढेच गौणखनिज उत्खनन केले किंवा कसे ? हे तपासून अहवाल सादर करावा. तसेच परवान्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास तसा अहवाल जागेस समक्ष भेट देऊन या कार्यालयास सादर करावा.

तहसिलदार भिवंडी
ता. भिवंडी, जि. ठाणे

तहसिलदार भिवंडी

Scanned with CamScanner